दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २५ सप्टेंबर २०२५ | अंक २७५ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**
१९९९ : रसायन शास्त्रज्ञ प्रा. एम. एस. शर्मा यांना एच. के. फिरोदिया पुरस्कार जाहीर.

SUN Tourism घर से घर तक
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# धनगर समाजाचा जालन्यात महाएल्गार
## आरक्षणासाठी लाखोंच्या संख्येने धनगरांचा जनसागर उसळला !



आम्हाला वेडे समजू नका, नाहीतर निवडणुकीत तुम्हाला घरी पाठवू, असा इशारा धनगर बांधवांनी दिला आहे. ज्या संविधनावर हा देश चालतो, त्या संविधानानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धनगर समाजाचा ST प्रवर्गात. समावेश केलेला आहे. गेल्या ७० वर्षांत इथल्या प्रस्थापित राज्यकर्त्यांनी समाजाला या लाभापासून वंचित ठेवलं. २०१४ ला भाजपाने सत्तेत येत असताना आम्हाला आश्वासन दिलं होतं, पण आता २०१४,२०१९ चया निवडणुका होऊन गेल्या तरी. धनगर समाजाला ST प्रवर्गाचा फायदा मिळाला नाही, असं सांगत धनगर समाज आक्रमक झाल्याचं दिसून येत आहे. आधी आमच्या हाती ST प्रमाणपत्र द्या, नाहीतर तुमच्या खुर्च्या रिकाम्या झाल्याशिवाय राहणार नाही, असा पवित्रा. जालना येथे आयोजित धनगर समाजाच्या मोर्चात आलेल्या मोर्चेकऱ्यांनी घेतला आहे. अनुसूचित जमातीच्या (ST) आरक्षण अंमलबजावणीसाठी हा भव्य मोर्चा शहरातून निघला

जालना /प्रतिनिधी धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मुख्य मागणीसाठी जालना शहरात बुधवारी दि.२४ सप्टेंबर २०२४ ऐतिहासिक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. दिपक बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या उपोषणाला जिल्हाभरातून प्रचंड जनसमर्थन मिळत असून या मोर्चामध्ये अक्षरशः जनसागर उसळला. सकाळी १० वाजेपासूनच जिल्हाभरातून धनगर समाजाचे जत्थे वाजत-गाजत, घोषणाबाजी करत जालना शहरात दाखल होऊ लागले. दुपारी १ वाजेपर्यंत शहरात चारही दिशांनी आंदोलकांचा महापूर उसळून आला. मंठा रोड,अंबड रोड, छत्रपती संभाजीनगर रोड, जळगाव राजा रोड या प्रमुख मार्गावरून येणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांच्या आम्हाला आमचा हक्क द्या,धनगर समाजाला एसटी आरक्षण द्या अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले.मोर्चामध्ये महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली.काही ठिकाणी पारंपरिक वाद्यांच्या गजरात समाजाचे जथे पुढे सरकत होते.तर युवकांकडून आक्रमक घोषणाबाजी होत होती. जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि गांधी चव्हाण चौक परिसरात समाजबांधवांची प्रचंड गर्दी उसळली होती.या ठिकाणाहून मोर्चा अंबड चौफुली येथील उपोषण स्थळाकडे निघाला. उपोषणकर्त्यांना ऐतिहासिक पाठिंबा दर्शवत हजारो आंदोलक एकदिलाने समाजाच्या हक्काची मागणी करत असल्याचे चित्र या वेळी पाहायला मिळाले. जालन्यातील या अभूतपूर्व मोर्चामुळे धनगर समाजाच्या मागणीला ऐतिहासिक बळ मिळाले असून प्रशासन आणि सरकारसमोर या आंदोलनाचा तोडगा काढण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

## हवामान विभागाकडून राज्यात हाय अलर्ट जारी

महाराष्ट्राला पावसानं झोडपून काढलं आहे. पावसामुळे राज्यात मोठं नुकसान झालं आहे. शेतकरी संकटात सापडला आहे. नद्यांना आलेल्या पुरामुळे परिस्थिती आणखी बिकट बनली आहे. दरम्यान पुन्हा एकदा हवामान विभागाकडून राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, पुढील पाच दिवस मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार असून येत्या 25 सप्टेंबर पासून ते 29 सप्टेंबरपर्यंत पावसाचा धोका कायम आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस होणार आहे. तर 27 सप्टेंबरला राज्यभरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील 24 तासांमध्ये बंगालच्या उपसागरात कमी दबाचा पट्टा निर्माण होणार आहे, त्यामुळे पुढचे पाच दिवस महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार 25 सप्टेंबर पासून ते 29 सप्टेंबरपर्यंत राज्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. तर येत्या 27 सप्टेंबरला मराठवाड्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे याच काळात विदर्भात देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, पुढील पाच दिवस मराठवाडा आणि विदर्भाला पाऊस झोडपून काढण्याची शक्यता आहे. दरम्यान बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्याच्या पार्श्वभूमीवर मच्छिमार बांधवांना समुद्रात न जाण्याचं आवाहन हवामान खात्याकडून करण्यात आलं आहे.

पावसामुळे मोठं नुकसान

राज्यात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे, पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे. मराठवाड्याला तर पावसाचा सर्वात मोठा फटका बसला आहे. उभी पिकं पाण्याखाली गेली असून, शेतकरी हवालदिल झाली आहेत, नद्यांना आलेल्या पुरामुळे तर परिस्थिती आणखी बिकट बनली आहे. पुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून, अनेक जण गावातच अडकले आहेत, त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्याचं काम सुरू आहे.पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्त भागांना भेटी देऊन, नुकसानाचा आढावा घेतला.

## ज्येष्ठ शिक्षिका सौ. ज्योती कळके (शिंदे)यांचा पौंडूळ येथे निरोप समारंभ

बीड (प्रतिनिधी)पौंडूळ येथील जि.प. प्राथमिक शाळा क्र. २ मध्ये गेल्या १२ वर्षांपासून कार्यरत असलेल्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. ज्योती मनोहर कळके (शिंदे मॅडम) यांची हिरापूर येथे बदली झाल्यामुळे, त्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम बुधवार, २४ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता गावकरी आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. शिरूर (का.) चे शिक्षण अधिकारी श्री. प्रशांत शिंदे, उबाठा गटाचे जिल्हाध्यक्ष श्री. उल्हास भैय्या गिराम, खालापुरी/फुलसांगवी केंद्राचे प्रमुख श्री. संभाजी सोनवणे, केंद्रीय मुख्याध्यापक श्री. अशोक सानप आणि पौंडूळचे माजी सरपंच श्री. शिवमुर्ती सानप, तसेच उपसरपंच श्री. अनिल सानप, ग्रामविकास अधिकारी श्री. आनंद बडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून सौ. ज्योती कळके यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. त्यांनी पौंडूळ येथील विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विद्यार्थी घडले आणि गावाच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागला. कार्यक्रमात बोलताना श्री. प्रशांत शिंदे यांनी सांगितले की, सौ. कळके यांनी फक्त पुस्तकी ज्ञानच दिले नाही, तर विद्यार्थ्यांना मूल्याधारित शिक्षण देऊन त्यांना एक






जबाबदार नागरिक बनवण्यासाठीही प्रयत्न केले. निरोप समारंभ आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समिती आणि समस्त गावकरी मंडळींनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये सौ. कळके मॅडमबद्दल असलेले प्रेम आणि आदर या कार्यक्रमातून दिसून आले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून त्यांच्या आठवणी सांगितल्या आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सौ. ज्योती कळके यांनी सर्वांचे आभार मानले. पौंडूळ गावातील लोकांचे प्रेम, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सहकाऱ्यांचे सहकार्य याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. हा निरोप समारंभ पौंडूळ गावाच्या इतिहासात एक अविस्मरणीय क्षण म्हणून नोंदवला गेला. सर्वांनी त्यांना हिरापूर येथील नवीन कामासाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या भविष्यातील वाटचालीस यश मिळो अशी कामना केली.

## कंकालेश्वर मंदिराच्या जतन, दुरुस्ती कामासाठी ९ कोटी १४ लक्ष निधीस प्रशासकीय मान्यता
### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

मुंबई दि.२४ : - कंकालेश्वर मंदिर, ता.जि.बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन, दुरुस्ती कामासाठी येणाऱ्या ९,१४,५४,४०३/- (रु.नऊ कोटी चौदा लक्ष चौपण्ण हजार चारशे तीन मात्र) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. या संदर्भातील शासन निर्णय सांस्कृतिक व पर्यटन पर्यटन विभागाने आज जारी केला आहे.संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. कंकालेश्वर मंदिर हे बीड शहरातील एक प्राचीन आणि भव्य शिवमंदिर आहे.वास्तुशैलीवरून ते १० व्या ते १२व्या शतकादरम्यान (सुमारे १००० वर्षे जुने) बांधले गेले असावे असे मानले जाते. ते बीडच्या ऐतिहासिक वारशाचे एक प्रमुख प्रतीक मानले जाते आणि पर्यटकांसह भक्तांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. मंदिराची वास्तुकला,



स्थान आणि धार्मिक महत्त्व यामुळे ते विशेष ओळखले जाते.मंदिराच्या बाह्यभागावरील शिल्पकला ही मराठवाड्यातील प्राचीन वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे. महाशिवरात्री आणि श्रावण महिन्यात या मंदिरात हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. मंदिराचे हे महत्त्व लक्षात घेऊन त्याचे जतन आणि संवर्धन करण्याची मागणी अनेक दिवसांपासून लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संघटनांकडून होत होती. त्याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पुढाकाराने हा विषय अखेर मार्गी लागला असून आज त्या संदर्भातील शासन निर्णय जारी झाला आहे.

## पाटोदेकरांना पुन्हा आला प्रत्यय जिथे विषय गंभीर तिथे नगरसेवक आसिफशेठ सौदागर, श्रीहरी गीते खंबीर



पाटोदा (प्रतिनिधी) पाटोद्यात पावसामुळे आलेल्या मांजरनदीला पुराने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले. शहरातील अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरून घरगुती वस्तूंचे नुकसान झाले,यामुळे नागरिकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या अचानक उभ्या राहिलेल्या या संकटामुळे पुरग्रस्त नागरिकांमध्ये भीती व चिंतेचे वातावरण निर्माण झाले असताना अशा गंभीर परिस्थितीत नगरसेवक आसिफशेठ सौदागर व नगरसेवक श्रीहरी बापू गीते तातडीने पुरग्रस्त भागात दाखल झाले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत नागरिकांशी थेट संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. जनतेच्या अडचणी हीच आमची जबाबदारी असे सांगत त्यांनी लोकांना धीर दिला.यावेळी नगरसेवक सौदागर व गीते यांनी फक्त आश्वासन न देता प्रत्यक्ष कृती दाखवत पुरग्रस्तांसाठी नाष्टा, चहा व जेवणाची सोय करून दिली. संकटसमयी मिळालेल्या या मदतीमुळे नागरिकांमध्ये दिलासा व समाधानाची भावना निर्माण झाली. नगरसेवकांच्या या कार्यतत्परतेचे नागरिकांनी स्वागत केले असून, खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी म्हणजे असे अशी प्रतिक्रिया पुरग्रस्तांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# बीड शहरातील ऐतिहासिक कंकालेश्वर मंदिरासाठी ९ कोटी १४ लाखांचा निधी
## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार

बीड (प्रतिनिधी)दि.२४ : शहरातील ऐतिहासिक कंकालेश्वर मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी ९ कोटी १४ लाख ५४ हजार ४०३ रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. हा भरीव निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. बीड शहरातील कंकालेश्वर मंदिर जुने व ऐतिहासिक असल्यामुळे जतन व दुरुस्तीची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निधीची मागणी







केली होती. कंकालेश्वर मंदिर हे बीड शहरातील प्राचीन व भव्य शिवमंदिर असून, ते सुमारे १० व्या ते १२ व्या शतकादरम्यान बांधले गेले असावे, असे मानले जाते. मंदिराचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व मोठे आहे. बाह्यभागावरील शिल्पकला ही मराठवाड्यातील प्राचीन वास्तुकलेचे उत्तम उदाहरण मानली जाते. महाशिवरात्री व श्रावण महिन्यात येथे हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मंदिराच्या संवर्धनासाठी सातत्याने मागणी होत होती. या मागणीची दखल घेत ना.अजितदादा पवार यांनी पाठपुरावा केला. त्यानंतर हा विषय मार्गी लागून शासन निर्णय जारी झाला आहे, तसेच पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी या निधीस मंजुरी मिळवून दिल्याबद्दल अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा
# बीडमध्ये 8 उपकेंद्रावर 2040 परीक्षार्थी

बीड दि. 24 :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा 2025 दिनांक 28 सप्टेंबर 2025 रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण 08 उपकेंद्रामधून सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 व दुपारी दुसरे सत्र 03 ते 05.00 वाजता अशी दोन सत्रात घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण 2 हजार 40 उमेदवार बसलेले आहेत.

परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी 08 उपकेंद्रप्रमुख 16 मदतनीस 32 पर्यवेक्षक 103 समवेक्षक असे एकूण 159 अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक 23 सप्टेंबर 2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

100 मीटर परिघात मनाई आदेश

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या 100 मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. दोन पेपरच्या मध्यल्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःच्या आधारकार्ड, निवडणूक आयोगाची ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांच्या परीक्षा उपकेंद्रावर पेपर क्रमांक -01 सकाळी 08.30 वाजता व पेपर क्रमांक 02 सत्रामध्ये दुपारी 1.30 वाजता उपस्थित राहावे. सकाळच्या सत्रात 09.30 वाजेनंतर आणि दुपारच्या सत्रात 2.30 वाजेनंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

*******

## संपादकीय

## EPFO नियमात मोठा बदल होणार?, 7 कोटी पीएफ धारकांना मिळणार लाभ, 7




देशातील कोट्यवधी पगारी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देणारी बातमी आहे. कर्मचारी भविष्य निधी (EPF) संदर्भातील नियमात सरकार मोठा बदल करण्याची तयारी करत आहे. सध्या पीएफ खात्यातून पैसे काढणे ही एक मर्यादित आणि अटी आणि शर्ती असणारी वेळखाऊ प्रक्रीया आहे. परंतू केंद्र सरकारला ही प्रक्रीया अधिक लवचिक आणि कर्मचारी केंद्रित करण्याचा विचार करत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकार पुढच्या एक वर्षाच्या आतच EPF चे पैसे काढण्याचे नियम सोपे आणि अधिक व्यावहारिक करण्याच्या बेतात आहे. हे पैसे संपूर्णपणे कर्मचाऱ्याचे असल्याने त्यांच्या त्यांच्या गरजेप्रमाणे ते काढण्याचे आणि त्याचा वापर करण्याचे स्वातंत्र्य मिळणे गरजेचे आहे. या पावलाने लाखो EPF अंशधारकांना अडीअडचणीच्या काळात आर्थिक आधार मिळणार आहे. सध्याच्या नियमानुसार कर्मचारी निवृत्तीच्या वेळी किंवा बेरोजगार असण्याच्या स्थितीत आपल्या पीएफ खात्यातून संपूर्ण रक्कम काढू शकतो. आंशिक पैसे काढण्याची अनुमती देखील काही विशिष्ट परिस्थितीच आहे. उदा. घर खरेदी करणे, लग्न वा मुलांच्या शिक्षणासाठीचा खर्च. या परिस्थितीत देखील सेवेचा किमान कालावधी आणि पैसे काढण्यावर मर्यादा घातलेली आहे.

उदाहरण घ्यायचे झाले तर कोणा सदस्याने सात वर्षे नोकरी पूर्ण केली आहे. तर तो त्याच्या पीएफ अकाऊंटमधून व्याजासहित एकूण जमा रकमेपैकी 50% टक्क्यांपर्यंत रक्कम काढू शकतो. हे पैसे त्याची स्वत:चे लग्न, मुलांचे लग्न, बहिण-भावाचे लग्नासाठी काढता येतात. याच प्रकारे कोणी सदस्याला त्याच्या कुटुंबासाठी घर विकत घ्यायचे असेल तर तो 90% पर्यंत रक्कम काढू शकतो. परंतू त्याने किमान तीन वर्षे नोकरी केलेली हवी आणि घर त्याच्या किंवा त्यांच्या पत्नीच्या नावावर असलेले हवे.शिक्षणाचा उद्देश्याने पैसे काढायचे असेल तर केवळ मुलांच्या मॅट्रीकनंतरच्या शिक्षणासाठीच पीएफचे पैसे काढण्याची मंजूरी आहे. यासाठी सदस्याने किमान सात वर्षांच्या नोकरी पूर्ण केलेली हवी आणि पैसे काढण्याची मर्यादा देखील 50% पर्यंतच आहे. आता नवीन बदलांनुसार शक्यता अशी आहे की सदस्याला दर 10 वर्षांनी एकदा त्याच्या PF खात्यातून संपूर्ण वा काही हिस्सा काढण्याची परवानगी दिली जाऊ शकते. एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकारच्या व्यवस्थेमुळे कर्मचाऱ्यांसाठी त्यांचे आर्थिक लक्ष्य आणि गरजांनुसार पीएफच्या पैशांचा वापर करण्याची संधी मिळणार आहे.

# पिके सडली, नदीकाठी मातीच राहिली नाही; पंचनामे करता कशाचे?

### खा.बजरंग सोनवणे यांचा सवाल, राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षांसोबत बांधावर जावून केली नुकसानीची पाहणी

बीड: दहा दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे.यामुळे नद्यानाल्यांना महापूर गेला. परिणामी, पाण्यामुळे पिके सडली आहेत. अनेक ठिकाणी मातीही खरडून गेली आहे. अशावेळी पंचनामे कशाचे करता, असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला. शिवाय ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत द्या, अशी मागणीही त्यांनी केली. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे हे बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या भेटीसाठी आणि नुकसानपाहणीसाठी दौऱ्यावर आले होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे, आ.संदिप क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी आ.सलीम भाई, मेहबूब शेख ,उषाताई दराडे, सुशीलाताई मोराळे आदी प्रमुख पदाधिकारी सकाळपासून या दौऱ्यात



सहभागी होते. बीड तालुक्यातील पिंपळवाडी, दत्तनगर, बेलखंडी, नागझरी, शिरापूर गात, शिरूर, आर्वी, नवगण राजुरी येथील व्यापारी व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांची संवाद साधला. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यात दहा दिवसातून किमान पाच दिवस अतिवृष्टी झाली आहे. शिरूर तालुक्यातून वाहणारी सिंदफणा, पाटोदा तालुक्यातून वाहणारी मांजरा नदीने रौद्ररूप धारण केले होते. नदीकाठी असलेल्या गावात पाणी शिरले. शेतातील पिके, जमीन, विहीरी डोळ्यादेखत वाहून गेल्या. कधी नव्हे इतके पाणी नागरिकांनी पाहिले. जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे कोटींचे शासकिय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. तर शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे नुकसान किती असेल, याचा अंदाज येत नाही.यामुळे सरकारने पंचनामे करत बसण्यापेक्षा ओला दुष्काळ जाहिर करून सरसकट मदत करावी, अशी मागणीही खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

**तर बीडमध्ये शरद पवारांच्या उपस्थितीत महामोर्चा: आ.शिंदे**

यावेळी प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे म्हणाले, बीड जिल्ह्यात शेतकरी बांधवांचे प्रचंड नुकसान झाले असून या अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना सक्षमपणे उभे करण्यासाठी ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. परंतु सरकार शेतकऱ्यांच्या वेदनांकडे शासन लक्ष देत नसल्याचे चित्र समोर आल्याने प्रचंड आक्रोश शेतकरी बांधवांमध्ये आहे. सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आधार द्यावा. राज्य सरकार व ठोस पाऊल उचलत नसेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस खांद्याला खांदा देऊन उभी राहणार आहे. नाशिकप्रमाणे बीडमध्ये सुद्धा पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत बीडमध्ये महामोर्चा काढला जाईल, अशी माहिती यावेळी आमदार शशिकांत शिंदे यांनी दिली.

# चकलंबा परिसरात दोन दिवसापासून अतिवृष्टी मुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

### नुकसानीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी 50 हजार भरपाई दया : भाजपचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख शकील यांची मागणी

**बळीराजा शेतकऱ्याचे अतिवृष्टी पाण्यामुळे नुकसान झाले आहे शासनाने याची दखल घेऊन शेतकऱ्याची कर्जमाफी करावी अशी अपेक्षा शेतकरी करीत आहे**

चकलंबा प्रतिनिधी:- गेवराई तालुक्यातील चकलंबा महसूल मंडळात रविवार रात्री व सोमवार रात्री दोन ते चार वाजेपर्यंत मुसळधार पाऊस झाल्याने गावातील काही घरात पाणी घुसून मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे.पाऊस झाल्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळआर्थिक मदत करावीअशी मागणी युवा नेते शकील शेख यांनी केली अतिवृष्टी मुळे खरीप हंगामातील कांदा, सोयाबीन,




मूग, अक्षरश नेस्तनाबूत झाले आहे. सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, तूर पीक पाण्याखाली गेले आहे काही शेतकऱ्यांचे सोयाबीन, उडीद पीक हाती येऊन गेले अशी परिस्थिती झाली आहे यासह



फळबागांना देखील मोठ्या प्रमाणात हानी

पोहोचले आहे रविवारी सोमवारी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने किती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या संपूर्ण शेतकऱ्यांच्या पिकाचे सरसकट पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत करावी अशी मागणी भाजपचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख शकील यांनी केली आहे

# राष्ट्रवादी (अजित पवार )गटाच्या ओबीसी सेलच्या केज ता.अध्यक्षपदी गोवींद ससाणे यांची निवड.

### सामाजिक सलोखा अबाधीत ठेवून विकासात्मक कामांना प्राधान्य देणार–गोविंद ससाणे.

सोनी जवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे यांची राष्ट्रवादी (अजित पवार ) गटाच्या ओबीसी सेलच्या केज तालुका अध्यक्ष पदी राज्याचे उप मुख्यमंत्री मा. ना. अजित पवार यांच्या आदेशाने जेष्ठ नेते रमेश आडसकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा नेतृत्व ऋषीकेश आडसकर यांच्या नेतृत्वा खाली ओबीसी सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे यांच्या अध्यक्षते खाली निवड करण्यात आली. ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याच्या निमीत्ताने गावकर्यांकडून आयोजीत सत्कार समारंभात बोलताना श्री.मिनाज पटेल यांनी सांगितले कि या निवडीला जातीय चष्म्यातून न पाहता, अठरापगड जातींच्या समाजाला योग्य न्याय देण्याचे काम करून सर्वांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करणार तसेच या निवडीमुळे सोनी जवळा गावची जिम्मेदारी वाढली असून सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असे अंबाजोगाई साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य,मिनाज पटेल सर यांनी सांगितले. यावेळी बोलताना ओबीसी सेलचे केज तालुकाध्यक्ष श्री गोविंद ससाणे यांनी आपले विचार मांडताना सांगितले कि, राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.अजित पवार साहेबांच्या, राष्ट्रवादी पक्षाच्या ध्येय धोरणा प्रमाणे पुढील वाटचाल आमचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर साहेबांच्या,ज्यांनी मला पद दिले त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेतृत्व ऋषीकेश आडसकर यांच्या नेतृत्वा खाली, तसेच ओबीसी सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय भागवतराव धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली केली जाईल तसेच सध्या अतिवृष्ठी ने केज तालुक्याती शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान झाले असून आमचे जेष्ठ नेते मा. रमेशराव आडसकर शेतकर्यांच्या बांधावर जावून प्रत्यक्ष नुकसानीची पहाणी करत आहेत नुकसानी चा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. झालेल्या निवडीला जातीच्या चेष्म्यातून न पाहता, जातीय तेड निर्माण न करता, सामाजिक सलोखा अबाधित राखून अठरापगड जातींच्या नागरीकांच्या समस्या, अडचणी सोडवण्याचे काम करणार आहे तसेच बेरोजगार युवकांसाठी जिल्हा उद्योग केंद्राकडून व्यावसाय मार्गदर्शन शिबीर आयोजीत करून युवकांना व्यावसायाचे मार्गदर्शन करणार, सर्वांचा विकास करून दोन समाजातील दरी मिटवण्यासाठी, शेतऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी



काम करत राहणार असे गोवींद बापू ससाणे,ओबीसी सेलचे (राष्ट्रवादी अजीत पवार ) गटाचे केज तालुकाध्यक्ष यांनी सांगितले सर्वांसाठी काम, सर्वांचा विकास करण्यासाठी काम करणार. यावेळी मान्यवरांची भाषणे झाली तसेच सत्कार समारंभ सोहळ्याचा समारोप झाला या प्रसंगी मिनाज पटेल सर, अंबाजोगाई साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य, वैजनाथ गायकवाड, जब्बार शेख, श्रीमंत गायकवाड, भागवत कोकाटे, सेवा सहकारी सोसायटी संचालक, अनिल ससाणे, सोमनाथ ससाणे, पांडुरंग ससाणे, श्रीराम ससाणे, हाजी महम्मद शेख, किरण ससाणे, पप्पू धेंडुळे, राहूल करपे, शिवाजी कोकाटे आदी ग्रामस्थ उपस्थित होते शेवटी गोविंद (बापू )ससाणे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर



## झोपेची कमतरता मेंदूसाठी दारुपेक्षाही खतरनाक, तज्ज्ञांचा सल्ला काय ?



अलिकडे झालेल्या संशोधनानूसार झोपेची कमतरता मेंदूवर मद्याच्या प्रभावाप्रमाणे काम करते असे उघड झाले आहे. सातत्याने झोपे कमी मिळाल्याने आपली एकाग्रता नष्ट होत असते. माणसाची स्मृती देखील कमी होते आणि मूडमध्ये लागोपाठ बदल होत राहातो. झोपेच्या कमतरतेचा परिणाम हा अस्थायी नसतो तर कायम स्वरुपी असतो. उदाहरणार्थ मद्य पिल्याने मेंदू अस्थायी रुपाने सुन्न होतो.परंतू अपुऱ्या झोपेचे परीणाम दीर्घकालीन रुपाने शरीरावर निगेटिव्ह इफेक्ट करीत राहतात. लागोपाट कमी झोपणाऱ्या लोकांची हळूहळू मानसिक आणि शारीरिक क्षमता कमी होत जाते.

झोपेचा संपूर्ण मेंदूवर होणारा परिणाम

झोपेच्या कमतरतेचा परिणाम दारु सारखा शरीरावर दिसू लागतो. रात्री नीट झोप न झाल्याने व्यक्तीला सातत्याने थकवा, मानसिक भ्रम आणि आळस येत राहतो.याशिवाय झोप न घेतल्याने मेंदूच्या पेशींचे कार्य देखील प्रभावित होऊ शकते. तज्ज्ञाच्या मते झोप न मिळाल्याने त्याचा परिणाम शरीरावर बराच काळ होत रहातो. झोपेच्या कमतरतेने शरीर आणि मेंदू हळूहळू कमजोर होऊ लागतो. तर मद्याचा परिणाम सर्वसाधारणपणे अस्थायी स्वरुपाचा असतो.

मेंदूला सुरक्षित कसे ठेवाल?

झोपेच्या कमीमुळे अनेक गंभीर त्रास सुरु होतात. त्यांना कमी करण्यासाठी काही उपाय देखील आहेत. तज्ज्ञांच्या मते रात्री ठराविक एकाच वेळेवर झोपणे आणि सकाळी ठराविक एकाच वेळी उठण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे शरीराचे जैविक घड्याळ योग्य होते. रोज किमान ७ तास झोपण्याचा प्रयत्न करा.त्यामुळे शरीर आणि मेंदूला योग्य आराम मिळेल आणि मेंदूच्या पेशी योग्य प्रकारे काम करतील. शरीराला सवय लावण्यासाठी रात्री ९ ते सकाळी ४ पर्यंत झोपण्याची वेळ ठरवा. ही वेळ मेंदू आणि शरीरासाठी योग्य मानली जाते. तज्ज्ञाच्या मते झोपेला प्राथमिकता दिल्याने केवळ थकवा दूर होत नाही तर मेंदू आणि शरीर बराच काळ कार्यरत रहाण्यासाठी हे मदतगार ठरते. चांगली झोप घेणे हे चांगल्या आरोग्याचे लक्षण मानले जाते. तज्ज्ञ या संदर्भात नेहमीच सल्ला देत असतात की पुरेशी झोप माणसासाठी का गरजेची असते. झोपेच्या अभावी अनेक आजारांना आमंत्रण मिळत असते.

( डिस्क्लेमर : या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती आणि उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)

# खा.डॉ.कल्याण काळे यांची अतिवृष्टीग्रस्त भागाला भेट चिखलातून मार्ग काढत शेतकऱ्यांशी साधला थेट संवाद


जालना/प्रतिनिधी जिल्ह्यातील बदनापूर, अंबड व जालना तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर जालना लोकसभेचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळपासून अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचण्यासाठी डॉ.काळे यांना चिखलातून वाट काढावी लागली.मात्र त्यांनी अडचणींचा विचार न करता शेतकऱ्यांच्या शेतात प्रवेश करून नुकसान प्रत्यक्ष पाहिले.या वेळी शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा खासदारांसमोर मांडल्या. बदनापूर तालुक्यातील तळणी, वाकूळणी,अंबड तालुक्यातील मठ जळगाव,बनटाकळी,तसेच जालना तालुक्यातील गोलापांगरीसह अनेक गावांमध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन कापूस,सोयाबीन व डाळीच्या



पिकांचे झालेले नुकसान पाहिले. डॉ. कल्याण काळे यांनी महसूल विभागाला तातडीने पंचनामा करण्याच्या आणि शेतकऱ्यांना त्वरित मदत पोहोचविण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा लक्षात घेता शासनाने कोणताही विलंब न करता तातडीची आर्थिक मदत द्यावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख,राजेंन राख, बदनापूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण म्हसलेकर,जयप्रकाश चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे राम सिरसाठ, भानुदास घुगे, कल्याण तारडे, दिनेश काकडे,बप्पासाहेब डोखळे,हनुमान धांडे,रामेश्वर फंड,जयसिंग राजपुत,सुभाष काटकर,विनायक आबा कोळकर,सुदाम काळे,तुकाराम संत,बंडु पागिरे,कृष्णा पाटील पडु ळ,सोपान तिरूखे,माऊली इंगोले यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण कंबरडे मोडले असून त्यांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आह

# माजलगाव भाजपच्या वतीने सेवा पंधरवाडा अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त कीट्टी आडगाव येथेभव्य रक्तदान शिबिर संपन्न

माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव मंडळ येथे नुकतेच माजलगाव भाजपाच्या वतीने सेवा पंधरवडा अंतर्गत देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य सर्व रोगनिदान शिबिर संपन्न करण्यात आले. या शिबिरामध्ये विविध रक्ताच्या चाचण्या घेऊन विविध आजारावर उपचार करण्यात आले तसेच भव्य स्वरुपात नमो नेत्र संजीवनी अभियान! राबविण्यात आले. या शिबिरामध्ये महिलांचा जास्त सहभाग नोंदवला गेला , स्वस्थ नारी सशक्त परिवारचया अनुषंगाने अनुषंगाने महिलांच्या विविध रक्ताच्या तपासण्या करून उपचार करण्यात आले. कीट्टी आडगाव येथे लोकनेत्या आदरणीय मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात आदरणीय जिल्हा अध्यक्ष शंकररावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनामध्ये कीट्टीआडगाव येथे स्वस्त नारी सशक्त परिवार नमो नेत्र संजीवनी शिबिर आयोजित करण्यात आले होते . पाचशे पेक्षा जास्त गरजू रुग्णांनी विविध तपासण्या करून विविध उपचार घेत या आरोग्य शिबिर सेवेचा लाभ घेतला . कीट्टीआडगाव येथील ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. कदम साहेब आणि डॉ.काळे साहेब यांचे आणि त्यांच्या स्टाफचे विशेष सहकार्य या आरोग्य शिबिरास लाभले. या आरोग्य तपासणी शिबिरासाठी दंतरोग तज्ञ , नेत्ररोग तज्ञ व स्त्री रोग तज्ञ यांनी रुग्णांना सेवा दिल्या. यावेळी रूपाली शरदर कचरे यांनी महिला वयोवृद्ध व लहान मुले यांच्या आरोग्य, जनजागृती आणि स्थानिक समस्यांवर संवाद साधून सेवा पंधरवडा निमित्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त हे विविध आजारावर आरोग्य शिबिर आम्ही घेत आहोत असे सांगत मोदी साहेब हे आपल्या परिवारातीलच आहेत कारण मोदी साहेब हे देशातील सर्व नागरिकांना आपल्या परिवारातील मानतात आणि म्हणून त्यांचा वाढदिवस हा अशा विविध उपक्रमांनी साजरा केला जावा या उद्देशाने भारतीय जनता पार्टीच्या वतीने



संपूर्ण भारत देशामध्ये अशी विविध समाज उपयोगी भव्य दिव्य स्वरूपात विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. यावेळी कार्यक्रम प्रसंगी भाजपा ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके डॉ. अशोक तिडके ,सौ रुपाली शरदराव कचरे डॉ.प्रशांत पाटील विनायक रत्नपारखी डॉ अभिजीत सोळंके ईश्वर खुरपे सरपंच रुक्मानंद खेत्रे साहेब नाना आगे शरद कचरे प्रदीप जाधवर सचिन तौर सुधाकर रासवे अशोक शिंदे दीपक गरड अनंत जगताप सिद्धू राठोड खय्युम पठाण बाळासाहेब शिरसागर रामेश्वर चव्हाण यासह अनेक भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवा भाऊ आभाळ फाटलं शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक हेक्टरी 50 हजार रुपये मदत करा व ओला दुष्काळ जाहीर करा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा शेतकरी नवनाथ अण्णा शिराळे पाटील

बीड प्रतिनिधी.सध्या महाराष्ट्रामध्ये सर्वत्र मुसळधार पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांना याचा फार मोठा फटका बसला असून याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यामध्ये काही तालुक्यात ढगफुटी होऊन शेतकऱ्याच्या जमिनी महापुराने वाहून गेल्या तसेच पिकामध्ये पाणी गेले हाताचे पीक वाया गेले काही शेतकऱ्यांचे पशुधन पाण्यामध्ये वाहून गेले बैल महेश शेळी गाय इत्यादी पाळीव पशुधन शेतकऱ्याचे पाण्यामध्ये पुरामध्ये वाहून गेले या सर्व बाबीमुळे शेतकरी मोठा आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्यावर फार मोठे आभाळ फाटले आहे आता या सर्व संकटातून शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उर्फ देवा भाऊ यांनी सर्व शेतकऱ्यांना तातडीने



नुकसान भरपाई द्यावी आणि सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे प्रशासनाच्या वतीने करून त्यांना तात्काळ हेक्टरी 50 हजार रुपये आर्थिक मदत मिळून द्यावी अशी अपेक्षा सध्या महाराष्ट्रातील तसेच बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांमधून व्यक्त होत आहे असे प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा शेतकरी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे तसेच काही शेतकऱ्यांच्या घरांमध्ये पाणी जाऊन घराची पडझड झाली असून अनेक घरे पाण्याच्या पुराने वाहून गेले आहेत तसेच घरातील अन्नधान्य देखील पाण्यामध्ये वाहून गेले आता खायचा प्रश्न देखील शेतकऱ्यांना पडला आहे त्याच्यामुळे शेतकऱ्यांना अन्नपुरवठा माध्यमाच्या माध्यमातून सरसकट गहू डाळ साखर तेल मीठ यासारखे अन्नधान्य पदार्थ देखील शासनाने तातडीने येणाऱ्या दिवाळीसाठी दसऱ्यासाठी सर्व शेतकऱ्यांना मोफत द्यावेत कुठल्याही शेतकऱ्याकडून त्याच्या बदल्यात पैसे घेऊ नये तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा भरला आहे अशा शेतकऱ्यांना तातडीने पीक विमा देण्यासाठी पीक विमा कंपनीला मुख्यमंत्री देवाभाऊ फडणवीस यांनी आदेशित करावे व तातडीने पिक विमा शेतकऱ्याच्या पदरात पाडावा असे देखील प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी तथा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिरळे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या आहेत आता या महत्त्वाच्या विषयाकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब नक्कीच लक्ष देऊन न्याय देतील आणि ओला दुष्काळ जाहीर करतील अशी अपेक्षा देखील तमाम शेतकरी बांधवांमधून व्यक्त होत आहे

# शाहू माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप करून केला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा वर्धापन दिन साजरा नानासाहेब घोडके

बातमीदारराष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा माजलगाव वतीने शाहु माध्यमिक विद्यालय पात्रुड येथे शैक्षणिक साहित्य व विद्यार्थ्यांना खाऊ वाटून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा तीसवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून माणिक राधाकिसन घोडके यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमाचे उद्घाटक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मा हरिभाऊ सावने, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यापारी महासंघ तालुका अध्यक्ष सुरेंद्र रेदासानी तर तर प्रमुख पाहुणे म्हणून महादेव सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मा सितारामजी सोनवणे व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके तसेच युवा जिल्हाध्यक्ष राजेश अण्णा जाधव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे कार्यक्रमासाठी उपस्थित होते या कार्यक्रमाचे विशेष सत्कारमूर्ती म्हणून रोटरी क्लब ऑफ माजलगाव यांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले श्री वाडेकर सर यांचा महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला

या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री हरिभाऊ सावने यांनी आपल्या भाषणामध्ये श्री संत गुरू रविदासांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे योगदान याबद्दल मार्गदर्शन केले तसेच जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या उभारणीमध्ये महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनरावजी घोलप साहेब यांच्या कार्याचा उल्लेख करत तळागाळातील लोकांना गटई कामगारांना पत्र्याचे



स्टॉल व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा समाज कल्याण विभागाच्या मार्फत उपलब्ध करून दिल्याचे विवेचन आपल्या भाषणामध्ये प्रस्ताविकामध्ये नानासाहेब घोडके यांनी केले, अध्यक्ष भाषणामध्ये सुरेंद्र रेदासानी यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल व आदरणीय बबनराव घोलप यांच्या कार्याला उजाळा देताना सर्व समाजाने एकत्रितरित्या येऊन समाज चळवळीमध्ये योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले

यावेळी सत्काराला उत्तर देताना आदर्श शिक्षक श्री अशोक वाडेकर बोलताना म्हणाले राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बबनराव घोलप साहेब यांनी अतिशय कष्टातून ही संघटना स्थापन केली असून या संघटनेचे रोपट राज्यातील गावागावापर्यंत पोहोचण्याचा कार्य कार्यकर्ता म्हणून आपण सर्वांनी केले पाहिजे आदरणीय बबनरावजी घोलप साहेब यांचे स्वप्न साकार करण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा माजलगाव यांच्या वतीने 300 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र सन्मानचिन्ह व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री मात्रे बीके, विश्वशांती आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे व्हि आर ,सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन वाघमारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गिन्यानदेव नावडकर, तालुका उपाध्यक्ष अर्जुन पोहेकर, जिल्हा संघटक राधाकीसन भाळशंकर, भाजपा तालुका सरचिटणीस संतोष जाधव व शाहू विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाचे वेळी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जगताप आर एम यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार श्री वडचकर सर यांनी मानले

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २५ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# आता गांजा लावून कर्ज फेडावं का ? अतिवृष्टीने फुलशेती उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्याचा सवाल

महाराष्ट्रामध्ये सुरू असलेल्या संततधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, विशेषतः मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांना मोठा फटका बसला आहे. सोलापूर, धाराशिव, अहमदनगर, जालना, बीड आणि करमाळा या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या हातातून आलेला घास हिरावला गेला आहे. सोलापूर जिल्ह्यात पावसाने हाहाकार माजवला असून शहराकडे येणारे आणि शहरातून जाणारे रेल्वे आणि रस्ते मार्ग पाण्याखाली गेल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. राज्यात सतत पडणाऱ्या पावसामुळे माढा आणि मोहोळ तालुक्यांमधील अनेक नागरिक पुराच्या पाण्यात अडकले आहेत. एनडीआरएफ आणि लष्कराच्या मदतीने बचावकार्य वेगाने सुरू आहे. माढा तालुक्यातील राहुलनगर, दारफळ आणि वाकाव येथे बचावकार्य सुरू आहे. हिंगोली जिल्ह्यातही संततधार पावसामुळे झेंडूच्या फुलांचे प्रचंड नुकसान झाले आहे. दिवाळी आणि दसरा या सणांच्या तोंडावर झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी नगदी पीक म्हणून फुलशेती केली होती. मात्र, ढगफुटीसदृश पावसामुळे त्यांचे संपूर्ण पीक मातीमोल झाले आहे. आता हे कर्ज कसे फेडायचे?

आता याबद्दल एका शेतकऱ्याने त्याची व्यथा मांडली आहे. मी साधारण 1 एकरवर झेंडू




लावला होता. त्यासाठी 2 लाख रुपयांचे कर्ज घेतले आणि 50 हजार रुपये स्वतः घातले. पण आता माझे पूर्ण पीक नष्ट झाले आहे. आता हे कर्ज कसे फेडायचे? सरकारनेच आम्हाला सांगावे की कर्ज फेडण्यासाठी आम्ही गांजा लावायचा का? असा सवाल शेतकऱ्याने केला आहे.आता सर्व मातीमोल झालेया शेतकऱ्यांनी कृषीमंत्र्यांनी प्रत्यक्ष येऊन पिकांची अवस्था पाहावी अशी मागणी केली आहे. सातत्याने झालेल्या पावसामुळे सोयाबीन, उडीद, मूग यांसारख्या पारंपरिक पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पारंपारिक पीक सोडून आम्ही नगदी पिकाकडे वळू लागलो आहेत. त्यामुळे आम्ही फुलशेती केली. पण आता सणासुदीच्या तोंडावर ढगफुटी झाल्यानंतर संपूर्ण झेंडू उद्ध्वस्त झाला आहे. दिवाळी आणि दसऱ्याला आम्हाला जे काही पैसे मिळणार होते, ते आता सर्व मातीमोल झाले आहे, अशी व्यथा एका शेतकऱ्याने मांडली आहे.

# बीडकरांसाठी अनिलदादांची हाक; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे नुकसानीचा अहवाल सादर!

## बीड जिल्हा ओला दुष्काळ घोषित करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी– अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी – मुसळधार पावसाने बीड जिल्हा अक्षरशः उध्वस्त झाला आहे. दि. १४ ते २३ सप्टेंबर या कालावधीत झालेल्या पूरपरिस्थितीमुळे प्रचंड नुकसान झाले असून त्याची आकडेवारी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी थेट महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांच्यासमोर मांडली असून पूरपरिस्थितीने बीड जिल्ह्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी, पीडित नागरिक आणि सर्वसामान्य जनतेसाठी दिलासा मिळावा, यासाठी बीड जिल्हा ओला दुष्काळ घोषित करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी,अशी मागणी त्यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली.मुसळधार पावसाच्या तडाख्याने सर्वात मोठा फटका शेतीला बसला असून तब्बल ७८ हजार ४५० हेक्टर जिरायत शेती पिकांचे नुकसान झाल्याची नोंद आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यभराच्या कष्टाच्या जमिनीवर पूर्णतः पाणी फिरल्याने हतबलता वाढली आहे. तसेच जिल्ह्यात ७ नागरिकांचा



मृत्यू झाला आहे. त्यात आष्टी तालुक्यात ५, परळी आणि धारूर तालुक्यात प्रत्येकी १ व्यक्तीचा समावेश आहे. सुदैवाने जखमींची कोणतीही नोंद नाही. याशिवाय, १३१ जनावरे दगावली तर घरांच्या नुकसानीत १८ पक्की घरे, १५९ कच्ची घरे, ५ झोपड्या आणि जनावरांचे १० गोठे उद्ध्वस्त झाले आहेत. पावसामुळे झालेल्या नुकसानाचा संपूर्ण अहवाल लक्षात घेऊन लागलीच आपण बीडकरांच्या पुनर्वसनासाठी ठोस पाऊले उचलणार असल्याचे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांनी सांगितले आहे.

# आरक्षण सोडतीस उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड,दि.24 : दि. 9 सप्टेंबर 2025 मधील अधिसूचना अन्वये बीड जिल्हयातील बीड जिल्हा परिषद गठीत होऊन लगत नंतरच्या दिवसापासून सुरु होणा-या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी अनुसूचित जाती, जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलांसह) सर्व साधारण प्रवर्ग व या प्रवर्गातील महिला यांच्यासाठी राखून ठेवायच्या पंचायत समिती सभापती पदाचे बीड जिल्हयातील पंचायत समितीनिहाय आरक्षण निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखली दि. 30 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 3.30 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात सोडतीचे आयोजन केले आहे.

सर्व राष्ट्रीय व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे पदाधिकारी तथा जिल्हा परिषद व जिल्हयातील सर्व पंचायत समितीचे पदाधिकारी, नागरिक यांनी बैठकीस उपस्थित राहवे, असे (सा.प्र.) चे उपजिल्हाधिकारी शैलेस सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.




कवडगावथडी ता.माजलगाव येथील माजी सरपंच वैजेनाथराव तौर यांचे मागील काही दिवसापूर्वी दुःखद निधन झाले असता आज त्यांचा कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन करताना माजी सभापती नितीनदादा नाईकनवरे.यावेळी सोबत बाजार समिती संचालक भगवान नाना आगे,शेलापुरी सरपंच गणेशराव शेंडगे,लहू तांबे व उवस्थित सर्व.

# लुखेगाव येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची सुरुवात

माजलगाव प्रतिनिधी तालुक्यातील लुखेगाव येथे बुधवार २४ सप्टेंबर रोजी सरपंच नासेर खा दौलत खा पठाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाची सुरूवात करण्यात आली. या अभियाना अंतर्गत ग्रामपंचायत केंद्रबिंदु बनवुन गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा, डिजीटल सुविधा, म हिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मिती या बाबींवर गावात काम करून लोकसहभाग चळवळीतुन गावाचा लुखेगाव येथे पंचायत राज अभियानस सुरुवात विकास करण्यासाठी ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य यांच्या सहकार्याने कटिबध्द असल्याचे लोकनियुक्त सरपंच नासेर खा दौलत खा पठाण यांनी सांगितले. त्याचबरोबर या अभियाना अंतर्गत जलसमृध्दी, स्वच्छ व हरितगाव, मनरेगा, उपजिवीका विकास, सामाजिक न्याय, श्रमदान, लोकसहभाग, स्वनिधी व सुशासन युक्त पंचायत अशा विवीध विषयावर गावात काम करण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला. यावेळी सरपंच नासेर खा दौ वलत खा ग्रामपंचायत अधिकारी एम. आर. गेंदले यांचेसह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.



# राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी माध्यम होय - डॉ. स्वानंद कुलकर्णी

माजलगाव प्रतिनिधी दिनांक 24/09/2025 राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी माध्यम होय असे प्रतिपादन माजलगाव येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे साळेगाव येथे आयोजित महिला आरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी तसेच मंचावर माजलगाव येथील प्रसिद्ध एम.डी. मेडिसिन तज्ञ डॉ. प्रताप लेंडाळ, बालरोग तज्ञ सौ. श्रद्धा लेंडाळ, स्त्री रोग तज्ञ डॉ. अंजली अकोलकर, दंतरोग तज्ञ डॉ. प्रतीक पोतदार, सरपंच श्री. प्रशांत राठोड, ग्रामसेवक श्री. कावळे,देवगिरी अर्बनचे चेअरमन श्री.दीपक कदम उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही सामाजिक एकात्मतेने काम करणारी व विद्यार्थ्यांना सतत सामाजिक जाणीव जागृत करून देणारी एक संघटन आहे. अशा माध्यमातून आज आपण येथे महिलांचे आरोग्य शिबिर घेऊन त्यांच्या वेगवेगळ्या रोगाविषयी निदान करून मोफत उपचार व मार्गदर्शन करणार आहोत. राष्ट्रीय सेवा योजना जसे समाजासाठी काम करते तसेच आज आम्ही सर्व डॉक्टर समाजासाठी एकत्र आलो आहोत आणि यातून समाजसेवा घडावी असा आमचा उद्देश आहे. व समाजसेवेचे हे वृत्त आम्ही अखंडपणे आयुष्यभर चालवणार आहोत असे आश्वासनही त्यांनी दिले.

याप्रसंगी डॉ. प्रताप लेंडाळ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की समाजाचा आपण काहीतरी देणे लागतो समाजाचे ऋण फेडायचे असेल तर असे सामाजिक उपक्रम घेऊन समाजातील लोकांना सेवा देण्याचे काम आम्ही या माध्यमातून करणार आहोत. याबरोबरच माजलगाव येथे देखील आम्ही मोफत शिबिराचे आयोजन भविष्यात करणार आहोत. त्यासाठी सिद्धेश्वर महाविद्यालयाने आम्हालाही हा पूर्व संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल महाविद्यालयाचे त्यांनी कौतुक केले.

याप्रसंगी माजलगाव येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. अंजली अकोलकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, माजलगाव मधील आपल्या हॉस्पिटलमध्ये साळेगाव येथील गावकऱ्यांना अत्यंत कमी पैशांमध्ये उपचार केले जातील व सवलतीच्या दरात सिद्धेश्वर महाविद्यालयाचा जसा सामाजिक उपक्रम सुरू आहे तसा माझ्या हॉस्पिटलच्या वतीने देखील येथील गावच्या रुग्णांची सेवा करण्याचा उपक्रम आम्ही यापुढे राबवणार आहोत त्याचा सर्व गावकऱ्यांनी फायदा




घ्यावा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

यاप्रसंगी देवगिरी अर्बनचे चेअरमन श्री. दीपक कदम यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सिद्धेश्वर महाविद्यालय आपल्या गावासाठी जे काम करत आहे ते खरोखरच कौतुकास्पद आहे आणि आपण गावकऱ्यांनी देखील त्यांच्या या आवाहनास प्रतिसाद देऊन योग्य प्रकारे गावाचा विकास करून घ्यावयास हवा. त्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयाप्रती कृतज्ञता भाव व्यक्त केला.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही माझ्यासाठी नाही तर समाजासाठी "Not me But you" हे ब्रीद घेऊन चालणारे संघटन आहे. विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आपल्याला समाजासाठी काहीतरी करावयाचे आहे. समाजसेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे कार्य हे संघटन करते. गावामध्ये असे काही उपक्रम घेऊन गावकऱ्यांच्यामध्येही समाज सेवा भाव जागृत करण्याचे काम यापुढील काळात आपल्याला करावयाचे आहे. या अगोदर आपण दत्तक वृक्ष योजना राबवली आहे. आज आपण महिला आरोग्य शिबिर घेत आहोत असेच उपक्रम आपण या गावांमध्ये घेऊन गावचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार आहोत असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.शिवशंकर मिटकरी यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.ज्ञानेश्वर गवते यांनी केले तर आभार प्रा. अशोक होके यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, डॉ. बालासाहेब मुंडे, डॉ. गोरक्षनाथ फसले, डॉ. प्रेम राठोड, श्री. दीपक घोडके तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com